दिव्य मराठी - 16/10/2022

# भौरद येथे सायबर सुरक्षा जनजागृती अभियान सुरू

## सायबर गुन्हे रोखण्यासाठी तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन



सायबर सुरक्षा जनजागृती अभियानात उपस्थिताना मार्गदर्शन करताना मान्यवर.

**प्रतिनिधी | अकोला**

सायबर वॉरियर्स मोबाईल व्हॅनने भौरद येथून सायबर सुरक्षा जनजागृती अभियानास प्रारंभ झाला.

सायबर गुन्हे कमी करण्याच्या उद्देशाने, प्रत्येक गावात सायबर सुरक्षा जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स मोबाईल व्हॅन चे उद्घाटन प्राचार्य डॉ. जे. एम. साबू आणि क्विक हील फाउंडेशनच्या गायित्री केसकर, भौरद येथील सरपंच शिल्पा सरदार यांच्या हस्ते करण्यात आले.

\'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा\' हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स शीतल साखरे, नेहा टेरे, सानिका वाघमारे, शिक्षक समन्वयक डॉ. हरिदास खरात आणि गायत्री केसकर यांनी ग्रामपंचायत कार्यालय आयोजित कार्यक्रमात ग्रामस्थांना सायबर गुन्हे म्हणजे काय?, हे गुन्हे किती प्रकारचे असतात, याबाबत मार्गदर्शन केले.

ई-केवायसी, पीक विमा, अनुदान यासाठी कोणत्याही नवीन व्यक्ती जवळ आपले आधारकार्ड, पॅन कार्ड, इलेक्शन कार्ड, अंगठ्याचा ठसा खात्री केल्याशिवाय देऊ नये. तुम्हाला लॉटरी लागली, तुम्हाला कर्ज मंजूर झाल्याने एवढे पैसे भरा या आणि अशा मेसेज ला प्रतिसाद दिल्यास कशी फसवणूक होते आणि या पासून आपण कसे सुरक्षित राहावे याविषयी सविस्तर माहिती सांगितली. कळत न कळत जर आपण सायबर गुन्ह्यात अडकल्यास काय करावे, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.